12-05-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 5/11/2025 9:41 PM Page 1

निवडक

दत्तगुरु अभ्यंकर शुभधा सावईकर विशांत वझे सुरेश बायेकर

पाळीत उद्या देवर्षी नारद जयंती निमित्त कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

डिचोली, दि. ११ : गोव्यातील गोमंतक संत मंडळ संचालित कीर्तन विद्यालय फोंडा गोवा देवकी कृष्ण कीर्तन विद्यालय माशेल व विष्णूस्मृती प्रतिष्ठान पाळी आयोजित देवर्षी नारद जयंती पाळी श्री नवदुर्गा देवस्थानात सभागृहात विविध कार्यक्रमानिशी दि १३ मे रोजी साजरा होणार आहे.यात सर्व प्रथम संध्याकाळी ४.३० वाजता चक्रीकीर्तन यात ह.भ.प. सावली गावकर, ह.भ.प.पदमजा काळे, ह.भ.प.ईश्वरी कांदोलकर यांच्या कडून कीर्तन सादर होईल. ६.३०वाजता गोव्यातील चार विविध क्षेत्रात सेवा देणाऱ्या मान्यवरांचा देवर्षी नारद पुरस्कारानी सत्कार करून सन्मानित करण्यात येणार आहे. यात कीर्तनकर दत्तगुरू अभ्यकर, समाज सेविका शुभदा सावइकर, पत्रकार विशांत वझे, नाट्य लेखक, कवी पत्रकार सुरेश बायेकर यांचा मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, निमंत्रित पाहुणे मंगेश गावस, जयंत मिरिंगकर, सुहासबुवा वझे, किरण भावे, प्रशिला गावडे, देवानंद सुर्लकर, संदीप गावकर यांची उपस्थिती असेल.

दामोदर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा 'युविका २०२५'मध्ये समावेश

■ टीम दैनिक हेराल्ड

अनंत आमशेकर

आगोंद, दि. ११ : काणकोण तालुक्यातील लोलये येथील दामोदर विद्यालयाचा इयत्ता ९वीचा विद्यार्थी अनंत जितेंद्र आमशेकर याची भारतीय अवकाश संशोधन संस्था (इसआरओ) च्या युवा वैज्ञानिक कार्यक्रम' (वायूव्हीआयके) २०२५ साठी निवड झाली आहे. देशभरातील ३५० निवडक विद्यार्थ्यांपैकी अनंतचा समावेश असून, या निवडीमुळे गोव्याचा सन्मान वाढला आहे. या निवडीमध्ये शैक्षणिक गुणवत्ता, शालेय, तालुका, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर विज्ञान प्रकल्पांमध्ये केलेला सहभाग, तसेच खेळामध्ये केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचा समावेश होता. अनंतने मागील तीन वर्षांपासून विज्ञान प्रश्नमंजूषा, विज्ञान प्रदर्शन, आणि विविध शैक्षणिक तसेच क्रीडा उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला आहे. या यशासाठी त्याला त्याच्या शिक्षिका श्रद्धा देसाई यांनी मार्गदर्शन केले. नंत बुद्धिबळ खेळण्यात रस घेतो तसेच तबला वादनाची त्याला विशेष आवड आहे. विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील नवकल्पनांबद्दल आवड असलेल्या अनंतने भविष्यामध्ये विज्ञान क्षेत्रात करिअर करण्याचा मनोदय व्यक्त केला आहे. युविका २०२५ अंतर्गत, अनंतला केरळमधील तिरुवनंतपुरम येथे असलेल्या विक्रम साराभाई अवकाश केंद्रामध्ये दोन आठवड्यांच्या निवासी प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी मिळणार आहे.

डिचोलीत १४ रोजी 'गुणदर्शन -२०२५'

■ टीम दैनिक हेराल्ड

डिचोली, दि. ११ : बालभवनतर्फे डिचोली बालभवन केंद्राच्या सहकार्याने 'गुणदर्शन २०२५' कार्यक्रमाचे आयोजन बुधवार दिनांक १४ रोजी दुपारी ३:३० वाजता केशव सेवा साधना संचालित नारायण झांट्ये विशेष मुलांची शाळा सभागृहात वाठादेव सर्वण येथे आयोजित करण्यात आले आहे. केशव सेवा साधना शाळेचे व्यवस्थापक मकरंद कामत हे प्रमुख पाहुणे म्हणून या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.सन्माननीय अतिथी म्हणून बालभवन चे संचालक मनोज सावईकर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाला खास निमंत्रित म्हणून डिचोली पालिकेच्या नगरसेविका ड. रंजना वायंगणकर, कारापूर सर्वण पंचायतीच्या उपसरपंच दिव्या नाईक यांचीही उपस्थिती लाभणार आहे.

शिवोली येथे १७ रोजी रघुनाथ बुवा यांची पुण्यतिथी

■ टीम दैनिक हेराल्ड

म्हापसा, दि. ११ : समर्थ रामदास सेवा भक्ती मंडळ समर्थ मठ, कुचेली – कामुर्ली, तीन माड, सडये, शिवोली येथे शनिवार दि. १७ रोजी प. पू. गुरुवर्य रघुनाथ बुवा खाडिलकर ३२वी पुण्यतिथी महोत्सव व कामधेनू भिक्षा फेरी प. पू. रघुनाथबुवा खाडिलकर यानी आपले जीवन समर्थ कार्यात वाहून घेतले, त्यानी समर्थ प्रचार व प्रसार कीर्तने, भिक्षा फेरी, उपासनेद्वारे महाराष्ट्र–गोवा येथे कार्य केले व अनेक शिष्यगण तयार केले, तसेच श्री समर्थ रामदास सेवा मती संरामी स्थापना त्यांच्याच प्रेरणेने झाली व गोव्यात भव्य दिव्य असे एकमेव समर्थाचे मंदिर–मठ स्थापन झाले. प. पू. खाडिलकर बुवा रामदासी यांच्या ३२व्या पुण्यतिथी निमित्त व त्यांच्या कार्याबद्दल जागृती व जाणीव व्हावी म्हणून कार्यक्रम होणार आहेत.

आयपीएलसाठी बीसीसीआयने आखला सुपरप्लॅन

पुढच्या १६ सामन्यांसाठी घेतला मोठा निर्णय | सामना मे महिन्यातच करण्याचे लक्ष्य

नवी दिल्ली, दि. १० :

आयपीएलचे आता १६ सामने बाकी आहेत. पण हे सोळा सामने कधी खेळवायचे, याबाबत आता बीसीसीआयने एक मोठा निर्णय घेतला आहे. संघांचे नुकसान टाळण्यासाठी आता बीसीसीआयने नेमके काय ठरवले आहे, हे आता समोर आले आहे.

भारत आणि पाकिस्तान यांच्यात संघर्ष विरामानंतर आयपीएल टी–२० क्रिकेट लीग घेण्याबाबत भारतीय क्रिकेट बोर्डात (बीसीसीआय) खल सुरू झाला आहे. ही लीग फार लांबणीवर न टाकता तिची सांगता मे महिन्यातच करण्याचे बीसीसीआयचे लक्ष्य असल्याचे संकेत मिळत आहेत. ही लीग स्थगित करतानाच त्यादृष्टीने विचार झाला होता, असे बीसीसीआयच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

आयपीएल लांबणीवर टाकण्याचा निर्णय झाला, त्या वेळी उर्वरित लढती आशिया कप आणि बांगलादेशविरुद्धची मालिका या कालावधीत हे सामने होऊ शकतील, असे सांगण्यात आले होते; मात्र त्यात तथ्य नसल्याचे बीसीसीआय पदाधिकाऱ्यांनी सांगितले होते. ही लीग एका आठवड्याकरीता लांबणीवर टाकली असल्याचे आम्ही जाहीर केले होते. ही लीग त्यापेक्षा जास्त लांबणीवर टाकण्याची आमची तयारी नव्हती. त्याबाबत काही दिवसांत निर्णय होईल,' असे बीसीसीआयच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी भारत आणि पाकिस्तान यांच्यातील शस्त्रसंधी होण्यापूर्वी सांगितले होते.

नीरज चोप्रा क्लासिक स्पर्धेच्या संयोजकांनी आपली स्पर्धा बेमुदत लांबणीवर टाकली असल्याचे जाहीर केले. त्याच वेळी आयपीएल आठ दिवस लांबणीवर टाकली असल्याचे बीसीसीआयने स्पष्ट केले होते. त्या वेळीच लीगची मे महिन्यात सांगता करण्याबाबत विचार झाला होता. लीगचा कार्यक्रम ठरवताना भारताचा इंग्लंड दौरा नाही, तर कसोटी जगज्जेतेपदाची लढत लक्षात घेऊन सर्व काही निश्चित करावे लागेल, याकडे लक्ष वेधण्यात आले.

आशिया कप; तसेच बांगलादेशविरुद्धच्या मालिकेचा कालावधी आयपीएलच्या उर्वरित सामन्यांसाठी पर्याय होत नाही. हे घडल्यास दी हंड्रेड'च्या कालावधीत आयपीएलचे सामने होतील. इंग्लंडमधील ही लीग ५ ते ३१ ऑगस्टदरम्यान आहे. सप्टेंबरमध्ये लीग घेतल्यास त्या कालावधीत कॅरेबियन प्रीमियर लीग (१४ ऑगस्ट ते २१ सप्टेंबर) आहे. आयपीएलमध्ये इंग्लंडमधील नऊ आणि वेस्ट इंडिजमधील आठ खेळाडू खेळत आहेत.

आयपीएलचे सोळा सामने शिल्लक असून, ही लीग पूर्वनियोजित कालावधीत संपवण्यासाठी प्रसंगी रोज दोन सामन्यांचा पर्यायाचाही विचार केला जाणार आहे. लीग काही दिवसांत पुन्हा सुरू करण्याबाबत विचार होत आहे; मात्र विविध संघातील परदेशी खेळाडूंनी यापूर्वीच प्रयाण केले आहे; मात्र तो प्रश्न फ्रँचाइजींचा आहे,' असे बीसीसीआयच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

गोव्यात होणार २४वी आयपीसीए 'जागतिक बुद्धिबळ स्पर्धा २०२५'

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. ११ : अखिल भारतीय बुद्धिबळ महासंघाच्या अधिपत्याखाली कार्यरत दिव्यांगजन बुद्धिबळ महासंघाद्वारे आयोजित स्पर्धा भारतातील समावेशक क्रीडा क्षेत्र विकासासाठी ठरणार ऐतिहासिक; २१ ते ३१ जुलै दरम्यान होणाऱ्या स्पर्धेत २०+ देशांतील १००हून अधिक खेळाडू होणार सहभागी

पणजी, गोवा, २०२५: येथील इंटरनॅशनल सेंटरमध्ये २१ जुलै ते ३१ जुलै या कालावधीत २४व्या आयपीसीए जागतिक बुद्धिबळ स्पर्धेचे गोवा राज्य यजमानपद भूषविणार असल्याची घोषणा चेस फेडरेशन फॉर फिजिकली डिसेबल्ड (सीएफपीडी, दिव्यांगजन बुद्धिबळ महासंघ)द्वारे आज करण्यात आली. क्रीडा क्षेत्रात सर्वसमावेशकता आणणे आणि दिव्यांगजनांचे सक्षमीकरण करणे याबाबत भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गोवा राज्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी बाळगलेल्या दृष्टिकोनाशी सुसंगत म्हणून हा ऐतिहासिक क्रीडा उपक्रमाची ओळखला जाणार आहे.

अखिल भारतीय बुद्धिबळ महासंघाच्या अधिपत्याखाली दिव्यांगजन बुद्धिबळ महासंघ (सीएफपीडी) कार्यरत असून गोवा राज्या दिव्यांगजन बुद्धिबळ संघटना (जीसीएपीडी)च्या सहकार्याने आणि दिव्यांगजन सक्षमीकरण विभाग तसेच राज्य दिव्यांगजन आयोग (गोवा राज्य), भारतीय क्रीडा प्राधिकरण, युवा व्यवहार व क्रीडा मंत्रालय यांच्या पाठबळाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. गोवा राज्याचे दिव्यांगजन सक्षमीकरण मंत्री तसेच या स्पर्धेच्या आयोजन समितीचे चेअरमन सुभाष फळदेसाई यांच्या नेतृत्वाखाली या स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे.

या स्पर्धेच्या आयोजनामध्ये प्रमुख मार्गदर्शक महणून दिव्यांगजन सक्षमीकरण विभागाचे सचिव श्री. ई. व्ही. वल्लवन (आयएएस); राज्य दिव्यांगजन आयुक्त श्री. गुरुप्रसाद पावसकर; राज्य दिव्यांगजन सक्षमीकरण संचालिका श्रीमती वर्षा नाईक; आणि राज्य दिव्यांगजन आयुकत कार्यालयाचे सचिव ताहा हाजिक यांचा समावेश आहे. सीएफपीडीचे प्रतिनिधित्व एम. भास्करन (अध्यक्ष), आनंद बाबू (सचिव), जयवंत जी. हम्मनवार (पॅरालिम्पिक्स असोसिएशन ऑफ इंडियाचे सरचिटणीस), आर. श्रीवत्सन (वरिष्ठ मुख्य सल्लागार) आणि अलोन शुल्मन (चीफ आर्बिटर, आयए ग्रेड ए) हे करणार आहेत.

यजमान संस्था असलेल्या गोवा राज्य दिव्यांगजन बुद्धिबळ संघटना (जीसीएपीडी)च्या वतीने आयोजन समितीमध्ये संघटनेचे अध्यक्ष संजय बेलुरकर, उपाध्यक्ष श्री. समीर नाईक, सचिव संजय कवळेकर, खजिनदार बाळकृष्ण व्ही. तसेच युनिक चेस अकादमी व क्वीन्स चेस अँड कल्चरल क्लबचे तनीष कवळेकर, श्रीमती कोमल बांदेकर, अमृत नाईक यांचा समावेश आहे.

२४व्या आयपीसीए जागतिक बुद्धिबळ स्पर्धेमध्ये रशिया, इस्त्राईल, पोलंड, कझाकस्तान, युक्रेन, झेक प्रजासत्ताक, जर्मनी, दक्षिण आफ्रिका, संयुक्त अरब अमिरात (युएई), श्रीलंका आणि भारत यासह २०हून अधिक देशांतील १००हून अधिक अव्वल खेळाडू सहभागी होण्याची अपेक्षा आहे. प्रमुख सहभागी बुद्धिबळपटूंच्या यादीत इंटरनॅसन मास्टर गुरबानोव्ह आंद्रे (इस्त्राईल), एफएम मोलेंडा मार्सिन (पोलंड), एफएम सेव्हेरिनो सँडर (फिलिपिन्स), आयएम ओबोचुक आंद्रे (फिडे), एफएम व्हॅलेंटा विट व्हॅक्लाव (चेक प्रजासत्ताक), सीएम समर्थ राव (भारत) आणि आशियाई पॅरा–चॅम्पियन एफएम वेंकट कृष्णा कार्तिक (भारत) यांचा समावेश आहे. यजमान गोवा राज्यातून संजय कवळेकर आणि अमृत नाईक हे देखील स्पर्धेत भाग घेण्याची शक्यता आहे.

युजवेंद्र चहल प्रचंड संतापला



नवी दिल्ली, दि. ११ :

शस्त्रसंधी असूनही पाकिस्तानने नीच कृत्य केले, भारतावर पुन्हा हल्ला केला. श्रीनगर, राजस्थानमध्येही पाकिस्तानने त्यांचे वाईट हेतू पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. शस्त्रसंधी झाल्यानंतर काही तासांतच पाकिस्तानने हे घृणास्पद कृत्य केले. पाकिस्तानने शस्त्रसंधी मोडल्यामुळे भारतीयांना खूप राग आला आहे. लोकांमध्ये पाकिस्तानबद्दलचा राग आणखी वाढला आहे. दरम्यान, भारतीय क्रिकेटर युजवेंद्र चहलने त्याच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवर एक स्टोरी शेअर केली आहे.

युजवेंद्र चहलने इन्स्टाग्राम वर एक स्टोरी शेअर केली आहे. यात त्याने लिहिले आहे, कुत्ते की दुम तेड़ी की तेड़ी ही रहती है. म्हणजे कुत्र्याची शेपटी वाकडी ती वाकडीच राहते. चहलने हे कोणाला उद्देशून म्हटले आहे, हे स्पष्ट नाही. पण सध्याच्या परिस्थितीनुसार, त्याने हे पाकिस्तानसाठीच वापरले असावे, असे दिसते. राहुल तेवतिया आणि भारताचा माजी क्रिकेटर वीरेंद्र सेहवाग यांनीसुद्धा हीच स्टोरी शेअर केली. सेहवागने स्टोरी शेअर करताना लिहिले, यह नहीं सुधरेंगे। म्हणजे हे सुधारणार नाहीत. यावरून हे स्पष्ट होते की, सेहवाग शस्त्रसंधी मोडल्यामुळे पाकिस्तानवर भडकले आहेत.

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील तणावपूर्ण परिस्थितीमुळे आयपीएल २०२५ एक आठवड्यासाठी स्थगित करण्यात आले आहे. यावर्षीच्या आयपीएलमध्ये चहल पंजाब किंग्स या नवीन टीमसाठी खेळत आहे. आयपीएल २०२५ च्या मेगा ऑक्शनमध्ये पंजाब किंग्सने त्याला १८ कोटी रुपयांना विकत घेतले. चहलने आयपीएलच्या १८ व्या सीजनमध्ये आतापर्यंत १२ सामन्यांत १४ विकेट्स घेतले आहेत. त्याने चेन्नई सुपर किंग्सविरुद्ध हॅट्रिकही घेतली होती. पाकिस्तानने शस्त्रसंधीचे उल्लंघन केले आणि भारतावर हल्ला केला. भारतीय नागरिक खूप संतप्त झाले आहेत. युजवेंद्र चहल, राहुल तेवतिया आणि वीरेंद्र सेहवाग यांसारख्या क्रिकेटर्सनी सोशल मीडियावर पाकिस्तानबद्दलचा राग व्यक्त केला आहे. चहलने एक म्हण वापरली, तर सेहवागने थेट नाराजी व्यक्त केली.

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपचा अंतिम सामना लॉर्ड्सऐवजी होणार भारतात?

अंतिम फेरी ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण अफ्रिका | ११ जूनपासून होणार सामने

नवी दिल्ली, दि. ११ :

वर्ल्ड टेस्ट चॅम्पियन्शिपचं तीन पर्व पार पडली आहे. तिसऱ्या पर्वाचा अंतिम सामना ११ जूनपासून लॉर्ड्स मैदानात होणार आहे. यापूर्वी इंग्लंडने २०२१ आणि २०२३ मध्ये वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप फायनलचे आयोजन केले होते. त्यानंचर चौथ्या पर्वासाठी कसोटी मालिका सुरु होणार आहे. या पर्वासाठी बीसीसीआयने फिल्डिंग लावल्याचं बोललं जात आहे. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीचा सामना भारतात भरवण्यासाठी प्रयत्नशील असल्याचं बोलल जात आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने आगामी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप अंतिम फेरीचे आयोजन करण्यासाठी बोली सादर केली आहे. दरम्यान, बीसीसीआयने बोली सादर केल्यास इतर क्रिकेट बोर्डांकडून स्पर्धा होण्याची शक्यता नाही. शिवाय, उत्पन्नाच्या दृष्टिकोनातून आयसीसीने क्रिकेटची क्रेझ असलेल्या देशात अंतिम सामना आयोजित केल्यास फायदाच आहे. त्यामुळे २०२७ च्या जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेचा अंतिम सामना भारतात होणार हे जवळजवळ निश्चित आहे.

२०२५ वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप स्पर्धेच्या अंतिम फेरीसाठी भारत पात्र ठरू शकला नाही. न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलिया विरूद्धच्या मालिकेत पराभवाचं तोंड पाहावं लागल्याने भारताची संधी हुकली. तर दक्षिण अफ्रिकेने जबरदस्त कामगिरी केल्याने अंतिम फेरीचं तिकीट मिळालं. पण यामुळे आयसीसीचं नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. तिकीट विक्री आणि प्रायोजकत्वातील तोट्यामुळे आयसीसीला सुमारे ४ दशलक्ष पौंडचा महसूल गमावावा लागू शकतो, असे अहवालात म्हटले आहे. दरम्यान, आयसीसी स्पष्ट आहे की जर २०% चा अंतिम सामना भारतात झाला तर जाहिराती आणि तिकीट विक्रीतून चांगले उत्पन्न मिळू शकते. या कारणास्तव आयसीसी आगामी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप फायनलचे यजमानपद बीसीसीआयकडे सोपवण्याची दाट शक्यता आहे. २०२५ वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप स्पर्धेच्या अंतिम सामन्याची तारीख निश्चित करण्यात आली आहे. यावेळी दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया हे ११ जूनपासून सुरू होणाऱ्या वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप अंतिम सामन्यासाठी आमनेसामने येतील. हा सामना इंग्लंडमधील लॉर्ड्स स्टेडियममध्ये होत आहे. इंग्लंडमधील ओव्हल मैदानावर यापूर्वी २०२१ आणि २०२३ च्या स्पर्धेचा अंतिम सामन्यांचे आयोजन करण्यात आले होते. पहिल्यांदा भारत–न्यूझीलंड आमि दुसऱ्यांदा भारत–ऑस्ट्रेलिया आमनेसामने आले होते. दोन्ही वेळेस भारताला पराभवाचं तोंड पाहावं लागलं आहे.

भारताला मिळाला नवा कसोटी कर्णधार?

- २० जूनपासून 'जागतिक कसोटी अजिंक्यपद २०२५–२७'
- पुढील महिन्यात इंग्लंडचा दौरा

मुंबई, दि. ११ :

टीम इंडियाला पुढील महिन्यात इंग्लंडचा दौरा करायचा आहे. दोन्ही संघांमध्ये ५ सामन्यांची कसोटी मालिका खेळवली जाईल. २० जूनपासून सुरू होणाऱ्या जागतिक कसोटी अजिंक्यपद २०२५–२७ची ही पहिली मालिका असेल. या मालिकेने भारतीय क्रिकेटचे एक नवे युग देखील सुरू होईल. भारतीय दिग्गज रोहित शर्मा, जो कसोटी संघाचा कर्णधार देखील होता, त्याने अलीकडेच कसोटी स्वरूपातून निवृत्ती घेतली आहे. अशा परिस्थितीत भारतीय संघ या दौऱ्यावर नवीन कर्णधारासह जाईल. या कर्णधाराचे नाव निश्चित झाले आहे आणि बीसीसीआय लवकरच त्याची घोषणा करेल.

रोहित शर्मासाठी ऑस्ट्रेलिया दौरा खूप वाईट होता आणि टीम इंडियालाही पराभवाचा सामना करावा लागला. तेव्हापासून असे मानले जात होते की रोहितला आता कसोटीत स्थान मिळणार नाही. या सर्व बातम्यांमध्ये, त्याने निवृत्तीची घोषणा करून सर्वांना आश्चर्यचकित केले. यानंतर, अनेक स्टार खेळाडू नवीन कर्णधाराच्या शर्यतीत सामील झाले, ज्यामध्ये सर्वात मोठे नाव जसप्रीत बुमराहचे आहे. पण तो या शर्यतीत मागे पडला आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, युवा स्टार फलंदाज शुभमन गिल भारतीय कसोटी संघाचा नवा कर्णधार असेल.

मीडिया रिपोर्ट्सनुसार, या दौऱ्यासाठी टीम इंडियाची निवड २३ किंवा २४ मे रोजी केली जाईल. इंग्लंड दौऱ्यावर गिल भारतीय संघाचा कर्णधार असेल हे निश्चित झाले आहे. त्याच वेळी, बीसीसीआय पत्रकार परिषद घेऊन गिलला पुढील कर्णधार म्हणून घोषित करू शकते. एवढेच नाही तर, वृत्तानुसार गिलने भारतीय कसोटी क्रिकेटच्या रोडमॅपवर चर्चा करण्यासाठी मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर आणि मुख्य निवडकर्ता अजित आगरकर यांचीही भेट घेतली आहे.

शुभमन गिल पहिल्यांदाच रेड–बॉल क्रिकेटमध्ये टीम इंडियाचे नेतृत्व करणार आहे. याआधी त्याने टी–२० स्वरूपात टीम इंडियाचे नेतृत्व केले आहे. गेल्या वर्षी तो संघाचा कर्णधार म्हणून झिम्बाब्वेला गेला होता, तेव्हा ५ टी–२० सामने खेळले गेले होते. याशिवाय तो आयपीएलमध्ये गुजरात संघाचा कर्णधार देखील आहे. आयपीएल २०२५ मध्ये त्याच्या नेतृत्वाखालील संघाची कामगिरी उत्कृष्ट राहिली आहे.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २४९ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 249 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .